# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

मध्यवर्ती कार्यालय :– 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी,
शाहू नगर, गोडोली, सातारा– ४१५००१.

राज्य कार्याध्यक्ष संपर्क : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे – ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१० Email : avinashpatilmans@gmail.com


दि. / /२०१५

## प्रदूषणमुक्त दिपोत्सवासाठी –फटाके विरोधी अभियान

**प्रति,**

**माननीय** ______________________

**म. मुख्याध्यापक/प्राचार्य /**

______________________

**विषय :– फटाके विरोधी अभियानात सहभागी होण्याबाबत....**

**सप्रेम नमस्कार,**

सण, उत्सव साजरा करणे हा मानवी जीवनातील आनंदाचा भाग आहे. आधुनिक जगात आपण आपला आनंद साजरा करताना स्वत:चे, कुटुंबाचे,समाजाचे आणि निसर्गाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी येऊ घातलेल्या **दिपोत्सवावेळी** प्रामुख्याने आणि इतरही अनेक प्रसंगांमध्ये फटाके फोडण्याची पद्धत टप्प्याटप्प्याने सोडून देणे आवश्यक आहे. आपण गेल्या १० वर्षापासून संपूर्ण राज्यात प्रदूषणमुक्त दिपावलीसाठी **'फटाके विरोधी अभियान'** राबवित आहोत. त्यामध्ये विद्यार्थी–पालकांसह समाजातील सर्वांनाच फटाके, शोभेची दारुची खरेदी कमीत कमी करण्याचे आणि वाचलेल्या पैशांतून विधायक कृतीचे पर्याय देण्याचे आवाहन मास्टर–ब्लास्टर सचिन तेंडलुकर, सुप्रसिद्ध सिने–नाट्य अभिनेते नाना पाटेकर, सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, आदिवासींमध्ये आरोग्य संवर्धाने कार्य करणारे डॉ. प्रकाश आमटे, केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य–अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव आणि जागतिक किर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र अंनिसचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. एन. डी. पाटील आदि मान्यवरांनी केले आहे.

आपणास विनंती की, आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत फटाके फोडल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती पोचविली जावी. तसेच त्यापासून परावृत्त होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून पालकांच्या संमतीने **'संकल्प पत्र'** भरुन देणे अपेक्षित आहे. अशा संकल्पित विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळांच्या सहभागाने फटाकेमुक्त दिवाळीचे आवाहन करणारी व अनुकुल वातावरण निर्मितीसाठी **'प्रबोधन फेरी'** काढण्याचा आपला प्रयत्न आहे. त्यात आपल्या शाळा/कॉलेज/कार्यालयातील संकल्प घेतलेल्या विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांनी सहभागी व्हावे असे अपेक्षित आहे.

फटाके विरोधात अभियान सहभागी होणाऱ्या शाळा/कॉलेज/कार्यालय यांना फटाके न फोडण्याचे किंवा कमी फोडण्याचे संकल्प एकत्रितपणे नोंदविल्याबद्दल मान्यवरांच्या सहीचे आकर्षक सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. संकल्पपत्रे भरून घेण्याशिवाय इतर माध्यमातून उदा. पोस्टर प्रदर्शन, विविध स्पर्धा, व्याख्याने पथनाट्य आणि प्रबोधनाच्या विविध उपक्रमातून आपल्याला सहभाग देता येईल. आपल्या सूचनांचे व सहभागाचे स्वागत आहे.

आपण फटाके विरोधी अभियानात आपल्या शाळेचा सक्रीय सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाच्या राष्ट्रीय कार्यास हातभार लावाल अशी आशा बाळगतो. धन्यवाद!

**आपले विनीत,**

| **अविनाश पाटील** | **माधव बावगे** | **सुशिला मुंडे** | **मिलींद देशमुख** |
|---|---|---|---|
| राज्य कार्याध्यक्ष | राज्य प्रधान सचिव | राज्य प्रधान सचिव | राज्य प्रधान सचिव |
| ९४२२७९०६१० | ९४२२४६९५६४ | ९८७०७३०३६८ | ८०८७८७६८०९ |